सातारा जिल्हा परिषद, ग्रामपंचायत विभाग
दूरवनी क्रमांक ०२१६२/२३३८४३ ईमेल vptzpsatara२@yahoo.in

जा. क्र.ग्रापं/५/कावि/ग्राउभाउ/२०१६, दि. ४ /४/२०१६

प्रति,

......................................

......................................

सदस्य, जिल्हास्तरीय समिती,सातारा

विषय :- ग्राम उदय से भारत उदय अभियान (दिनांक १४ ते २४ एप्रिल, २०१६)
मा.जिल्हाधिकारी,सातारा यांचे अधक्षतेखालील जिल्हास्तरीय अंमलबजावणी व संनियंत्रण समिती ची बैठक दिनांक ६ /४/२०१६ करिता उपस्थित राहणेबाबत.

संदर्भ :-मा.जिल्हाधिकारी,सातारा यांचेकडील आदेश क्र.जा.क्र.ग्रापं /५/कावि/ग्राउभाउ/ २०१६, दि. ४ /४/२०१६

केंद्र शासनामार्फत दिनांक १४ एप्रिल, २०१६ (डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती) ते दिनांक २४ एप्रिल,२०१६ (राष्ट्रीय पंचायत राज दिवस) या कालावधीत **"ग्राम उदय से भारत उदय अभियान"** राबविण्यात येणार आहे. सदर अभियानाच्या परिणामकारक अंमलबजावणीसाठी उपरोक्त संदर्भीय आदेशान्वये गठीत केलेल्या जिल्हास्तरीय अंमलबजावणी व संनियंत्रण समितीचे आपण सदस्य आहात.

जिल्हास्तरीय अंमलबजावणी व संनियंत्रण समितीची बैठक मा.जिल्हाधिकारी,सातारा यांचे अध्यक्षतेखाली व मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प.सातारा यांचे उपस्थितीत दिनांक ६ /४/२०१६ रोजी स. ११ वाजता मा.जिल्हाधिकारी,सातारा यांचे दालनात आयोजित करणेत आली आहे.

सदर बैठकीसाठी आपण उपस्थित रहावे, ही विनंती.

उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रापं),
जिल्हा परिषद,सातारा तथा
सदस्य सचिव, जिल्हास्तरीय अंमलबजावणी व
संनियंत्रण समिती. (ग्राम उदय से भारत उदय अभियान)

वाचा :- १) मा.अतिरिक्त सचिव, पंचायती राज मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांचे अ.शा.पत्र
क्र.J- ११०११/१/२०१६-मेडीया दिनांक २३.३.२०१६.
२)कार्यालयीन मंजुर टिपणी दि. ४ /४/२०१६

---

क्र.ग्रापं/५/कावि/ग्राउभाउ/२०१६
ग्रामपंचायत विभाग,
सातारा जिल्हा परिषद,
सातारा , दि. ४ /४/२०१६

<u>जिल्हास्तरीय अंमलबजावणी व संनियंत्रण समिती गठण – आदेश</u>

केंद्र शासनामार्फत दिनांक १४ एप्रिल, २०१६ (डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती) ते दिनांक २४ एप्रिल,२०१६ (राष्ट्रीय पंचायत राज दिवस) या कालावधीत **"ग्राम उदय से भारत उदय अभियान"** राबविण्यात येणार आहे. अभियानाच्या मार्गदर्शक सूचना (इंग्रजी) केंद्र शासनाच्या MoPR च्या वेबसाईटवर दिनांक 23.3.2016 चे पत्रासोबत प्रसिध्द करण्यात आल्या आहेत. "ग्राम उदय से भारत उदय अभियान" सातारा जिल्हयामध्ये प्रभावीपणे राबवावयाचे आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १२५ व्या जयंतीच्या औचित्याने दिनांक १४ एप्रिल, २०१६ पासून राष्ट्रीय पंचायत राज दिवस दिनांक २४ एप्रिल, २०१६ पर्यंत "ग्राम उदय से भारत उदय अभियान" राबवावयाचे असून दिनांक २४ एप्रिल, २०१६ रोजी मा.पंतप्रधान महोदय ग्रामसभांना जाहीररित्या संबोधित करणार असून, मा.पंतप्रधान महोदयांचे भाषण सर्व ग्रामस्थांनी एकत्रित येऊन टेलिव्हीजनच्या माध्यमातून ऐकायचे/पहायचे आहे.

सदरचे अभियान अर्थपूर्ण, प्रेरणादायी व माहितीपूर्ण होण्यासाठी या मोहिमेमध्ये ग्रामपातळीवरील सर्व लोकांचा व शासकिय पातळीवरील सर्व यंत्रणांचा सहभाग असणे आवश्यक आहे. विशेषतः महिला, अनु.जाती, अनु.जमाती यांचा सहभाग मिळविण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करणे आवश्यक आहे. यासाठी जाजागृती करणे, दक्षतापूर्वक नियोजन, पंचायतीच्या लेकप्रतिनिधींमध्ये व ग्रामपातळीवरील कर्मचाऱ्यांमध्ये मोठया प्रमाणावर जाणीव जागृती व पध्दतशीर नियोजन करावयाचे आहे.

"ग्राम उदय से भारत उदय अभियान" अंतर्गत खालील कार्यक्रम अंतर्भूत आहेत.

१) सामाजिक एकता (Social Harmony) : दिनांक १४ ते १६ एप्रिल, २०१६.
२) ग्राम किसान सभा (Gram Kisan Sabha) : दिनांक १७ त २० एप्रिल, २०१६.
३) ग्रामसभा (Gram Sabha or Village Assembly) : दिनांक २१ ते २४ एप्रिल, २०१६.
४) मा.पंतप्रधान महोदयांचे ग्रामसभांना उद्देशून भाषण : दिनांक २४ एप्रिल, २०१६.

२१) **सामाजिक एकता (Social Harmony) : दिनांक १४ ते १६ एप्रिल, २०१६.**:-

डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १२५ व्या जयंतीच्या औचित्याने या कालावधीत सर्व ग्रामपंचायतींमध्ये ग्रामस्थांनी एकत्र येऊन डॉ.आंबेडकर यांना वंदन करतील. या कार्यक्रमामध्यें प्रामुख्याने दलितांचा जास्तीत जास्त सहभाग असेल याची खात्री करावी. यावेळी, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार घालून ग्रामस्थ सामाजिक एकता निर्माण करण्याचा निर्धार करतील. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे जीवन व राष्ट्रीय एकात्मतेविषयी त्यांचा दृष्टीकोन याबाबत यावेळी चर्चा करण्यात येईल. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचेविषयी लेखन साहित्य यावेळी वितरीत करण्यात येईल. या दिवशी, सामाजिक एकता प्रस्थापित करण्यासाठी शासनामार्फत राबविण्यात येत असलेल्या विविध योजनांची माहिती देण्यात येईल. प्रदर्शनांचे आयोजन करण्यात येईल.

**२) ग्राम किसान सभा** (Gram Kisan Sabha) : **दिनांक १७ ते २० एप्रिल,२०१६** :-

दिनांक १७ ते २० एप्रिल,२०१६ या कालावधीत प्रत्येक ग्रामपंचायतीमध्ये शेतकऱ्यांची सभा (ग्राम किसान सभा) आयोजित करावयाची आहे. ग्राम किसान सभेमध्ये कृषिविषयक योजनांची माहिती शेतकऱ्यांना द्यावयाची आहे. यावेळी शेतीमध्ये सुधारणा करण्यासाठी शेतकऱ्यांकडून सूचना मागविण्यात येतील.

**३) ग्रामसभा** (Gram Sabha or Village Assembly) : **दिनांक २१ ते २४ एप्रिल, २०१६.**

राष्ट्रीय पंचायत राज दिवस प्रत्येक वर्षी २४ एप्रिल रोजी साजरा करण्यात येतो. कारण याच दिवशी ७३ वी घटना दुरुस्ती अंमलात आली. ग्रामपंचायतींसाठी हा अत्यंत महत्वाचा दिवस असून गावाच्या

विकासासाठी ग्रामस्थांना एकत्रित करण्याची चांगली संधी आहे. या वर्षी राष्ट्रीय पंचायत राज दिवस ग्राम उदय से भारत उदय अभियानाच्या स्वरुपात साजरा करावयाचा आहे. यासाठी जिल्हयातील सर्व ग्रामपंचायतींनी दिनांक २१ ते २४ एप्रिल, २०१६ या कालावधीत कोणत्याही दिवशी **ग्रामसभा** आयोजित करावयाची आहे. सामाजिक व आर्थिक मुद्यांबरोबरच स्थानिक आर्थिक विकास, ग्रामपंचायतींचा विकास साधण्यासाठी ग्रामस्थांनी एकत्र यावे हा या ग्रामसभेच्या आयोजनाचा उद्देश आहे. सर्व ग्रामस्थांनी गावाच्या व देशाच्या विकासासाठी एकत्र येऊन **शपथ** घ्यावयाची आहे. दिनांक २१ ते २४ एप्रिल, २०१६ या कालावधीत ग्रामपंचायतींनी खालील उपक्रम राबवावयाचे आहेत.

• **पूर्वतयारी म्हणून खालील उपक्रम हाती घ्यावयाचे आहेत :**

प्रभात फेरी, स्वच्छता मोहिम, सांस्कृतिक कार्यक्रम, क्रिडा स्पर्धा, ज्येष्ठ नागरिकांचा सन्मान

❖ **प्रभात फेरी :-**

राष्ट्रीय पंचायत राज दिवसाचे महत्व ग्रामस्थांना पटवून देण्यासाठी व त्याबाबत वातावरण निर्मिती करण्यासाठी सर्व ग्रामस्थांना समाविष्ट करुन **प्रभात फेरीचे** आयोजन करावयाचे आहे. प्रभात फेरी दोन भागांमध्ये आयोजित करण्यात यावी. १) एका भागात मुले-मुली प्रभात फेरीत सहभागी होतील. यात मुली-मुलींना प्रभावित करणारे मुद्दे उदा.स्वच्छता, शिक्षण व अन्य स्थानिक मुद्यांबाबतचे संदेश देणारे प्लेक्स घेवून सहभागी होतील. प्रभात फेरीत प्लेक्सवर प्रदर्शित करावयाचे संदेशासाठी स्पर्धा आयोजित करुन मुलींनी तयार केलेले तक्ते, पोस्टर्स प्रभात फेरीच्यावेळी घोषणांसोबत प्रदर्शित केले जाऊ शकतील. २) दुसऱ्या भागात प्रौढ नागरिक सहभागी होतील. यात सहभागी होणारे नागरिक आर्थिक विकास व सामाजिक न्याय या संदर्भातील संदेश लोकांपर्यंत पोहचण्यासाठी प्लेक्स, घोषणा, स्लोगन अथवा इतर संवाद साधनांचा वापर करतील. प्रौढ नागरिकांच्या प्रभात फेरीमध्ये प्रामुख्याने ग्रामपंचायत विकास आराखडा प्रक्रियेवर भर दिला जाईल. तसेच गावातील सामाजिक व आर्थिक मुद्यांवर भर देण्यात येईल. या प्रभात फेरीत ग्रामपंचायतीचे सरपंच, उपसरपंच, सर्व सदस्य, महिला बचत गटातील सर्व सदस्य, प्रतिष्ठीत ज्येष्ठ व्यक्ती, युवक मंडळातील सर्व सदस्य, विविध योजनांतील साधन व्यक्ती (Resource Persons), ग्रामस्तरावरील शासकयि व निमशासकिय कर्मचारी यांना समाविष्ट करुन घेणे अत्यंत महत्वपूर्ण आहे.

❖ **स्वच्छता मोहिम :-**

दिनांक २१ ते २४ एपिप्रल, २०१६ या कालावधीत प्रत्येक ग्रामपंचायतीमध्ये स्वच्छता मोहिमेचे आयोजन करावयाचे आहे.ज्यामध्ये गावातील रस्ते, गल्ली-बोळे, इ.ची स्वच्छता, पिण्याच्या पाण्याच्या स्त्रोतांची स्वच्छता, हातपंप प्लॅटफॉर्मची स्वच्छता, कचरा विल्हेवाटीसाठी कंपोस्ट खड्डे (digging of garbage pits) तयार करणे, लोकांच्यामध्ये स्वच्छताविषयक जागृती करणेसाठी गृहभेटी, सार्वजनिक साफसफाई मोहिम इ.बाबींचा समावेश करावयाचा आहे.

शाळा, सार्वजनिक संस्था, कार्यालये, गृहभेटी अशा विविध ठिकाणी एकाचवेळी स्वच्छताविषयक वातावरण निर्मिती करणेसाठी ग्रामपंचायत सदस्यांचे ३ ते४ गट तयार करावेत. प्रत्येक गटात महिलांसह सर्व वयोगटांतील लोकांना सहभागी करुन घ्यावयाचे आहे.

❖ **सांस्कृतिक उपक्रम :-**

दिनांक २१ ते २४ एप्रिल, २०१६ या कालावधीत प्रत्येक ग्रामपंचायतीमार्फत सांस्कृतिक उपक्रम राबविण्यात येतील. यात पथनाट्ये, पारंारिक सांस्कृतिक प्रकार, लोकगीते, लोकनृत्य इ.चा समावेश करावयाचा आहे. ग्रामपंचायतीमधील महसुली गांवे, वाडया-वस्त्यांमधील महिलांसहित जास्तीत जास्त लोकांचा यात सहभाग मिळण्यासाठी त्यांना प्रोत्साहित करावे. सांस्कृतिक उपक्रमात जास्तीत जास्त लोकसहभाग मिळण्यासाठी महिला बचत गट, युवक मंडळे आणि शाळा यांना उद्युक्त करावे. विकासाबाबत व सामाजिक विषयांबाबत विद्यार्थ्यांचे स्टेज प्ले करण्यासाठी नियोजन करावे.

❖ **क्रिडा स्पर्धा :-**

दिनांक २१ ते २४ एप्रिल, २०१६ या कालावधीत ग्रामपंचायत स्तरावर विविध क्रिडा स्पर्धांचे आयोजन करावयाचे आहे. जास्तीत जास्त लोक क्रिडा स्पर्धेमध्ये सहभागी होतील याद्दष्टभ्ने स्पर्धा आयोजित कराव्यात. शाळा, माध्यमिक , उच्च माध्यमिक विद्यालये तसेच महाविद्यालयातील विद्याथी, युवक मंडळांचे सदस्य याबरोबरच स्वयंसेवकांची मदत क्रिडा स्पर्धा यशस्वी करण्यासाठी घेण्यात यावी. ग्रामपंचायतीचे क्षेत्रफळ व लोकसंख्या विचारात घेवून महसुली गावनिहाय क्रिडा स्पर्धा घ्यायच्या कि ग्रामपंचायतस्तरावर एकत्र स्पर्धा घ्यायच्या याबाबत ग्रामपंचायतीने सुयोग्य निर्णय घ्यावा.

क्रिडा स्पर्धांमधील विजेत्यांना ग्रामसभेमध्ये पुरस्कार देऊन सन्मानित करण्याबाबत ग्रामपंचायती निर्णय घेवू शकतील.

❖ **ज्येष्ठ नागरिकांचा सन्मान** :-

गावामधील ज्येष्ठ नागरिकांचा यथोचित सन्मान राष्ट्रीय पंचायत राज दिवस-ग्रामसभेमध्ये घेण्याबाबत ग्रामपंचायतींनी नियोजन करावे.

**ग्रामसभेत विचारात घ्यावयाचे मुद्दे** :

ग्रामसभेत प्राधान्याने खालील विषयांवर चर्चा करावयाची आहे.

❖ स्थानिक आर्थिक विकासासाठी ग्रामपंचायत विकास आराखडा तयार करणे.
❖ निधीचा ग्रामपंचायतीमार्फत योग्य विनियोग करणे.
❖ सुरक्षित पिण्याचे पाणी आणि स्वच्छता.
❖ ग्रामीण विकासामध्ये महिलांची भुमिका.
❖ अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, अपंग व्यक्ती, इतर दुर्बल घटक यांचे कल्याण व सामाजिक समावेशन.

• **ग्रामसभेत खालील महत्वाच्या शासकिय योजनांची माहिती देण्यात येणार आहे.**

१. प्रधानमंत्री ग्राम सडक योजना (PMGSY),
२. महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी कायदा (MGNREGA)
३. प्रधानमंत्री ग्रामीण आवास योजना
४. प्रधानमंत्री सुरक्षा विमा योजना
५. प्रधानमंत्री जीवन ज्योती विमा योजना
६. अटल पेन्शन योजना
७. प्रधानमंत्री जन धन योजना
८. सुकन्या समृध्दी योजना
९. बेटी बचाओ बेटी बढाओ योजना
१०. सर्व शिक्षा अभियान
११. आम आदमी विमा योजना
१२. राष्ट्रीय स्वास्थ्य विमा योजना
१३. प्रधानमंत्री मुद्रा योजना
१४. प्रधानमंत्री कौशल्य विकास योजना (PMKVY)
१५. दिन दयाल उपाध्याय ग्राम ज्योती योजना
१६. प्रधानमंत्री पीक विमा योजना
१७. दिन दयाल उपाध्याय ग्रामीण कौशल्य योजना
१८. राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान (NRHM)
१९. एकात्मिक बाल विकास सेवा (ICDS) योजना
२०. दिन दयाल अंत्योदय योजना (Day)
२१. अनुसूचित जाती, अनुसूचित जमातींसाठी विशेष योजना
२२. राष्ट्रीय सामाजिक सहाय्य कार्यक्रम (NSAP)
२३. प्रधानमंत्री कृषि सिंचाई योजना (PMKSY)
२४. अन्य महत्वाचे विषयाची माहिती

उपरोक्तप्रमाणे "ग्राम उदय से भारत उदय अभियान" सातारा जिल्हयामध्ये राबवावयाचे आहे. त्यासाठी या आदेशाद्वारे खालीलप्रमाणे जिल्हास्तरीय अंमलबजावणी व संनियंत्रण समिती गठीत करणेत येत आहे.

जिल्हास्तरीय अंमलबजावणी व संनियंत्रण समिती —

| | | |
|---|---|---|
| १. | मा.जिल्हाधिकारी,सातारा | अध्यक्ष |
| २. | मा.मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद सातारा | सह-अध्यक्ष |
| ३. | अतिरिक्त पोलीस अधिक्षक, सातारा | सदस्य |
| ४. | अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद सातारा | सदस्य |
| ५. | निवासी उपजिल्हाधिकारी , सातारा | सदस्य |

| | | |
|---|---|---|
| ६. | उपजिल्हाधिकारी (रो.ह.यो.), सातारा | सदस्य |
| ७. | प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा,सातारा | सदस्य |
| ८. | जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी ,सातारा | सदस्य |
| ९. | विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी, सातारा | सदस्य |
| १०. | व्यवस्थापक, अग्रणी बँक सातारा | सदस्य |
| ११. | जिल्हा माहिती अधिकारी, सातारा | सदस्य |
| १२. | उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पाणी व स्वच्छता) जि.प.सातारा | सदस्य |
| १३. | जिल्हा समाजकल्याण अधिकारी, जि.प.सातारा | सदस्य |
| १४. | कृषि विकास अधिकारी, जि.प.सातारा | सदस्य |
| १५. | जिल्हा आरोग्य अधिकारी, जि.प.सातारा | सदस्य |
| १६. | शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जि.प.सातारा | सदस्य |
| १७. | शिक्षणाधिकारी (माध्यमिक) , जि.प.सातारा | सदस्य |
| १८. | श्री.घोरपडे, आत्मा प्रकल्प, कृषि विभाग, सातारा | सदस्य |
| १९. | महिला व बाल विकास अधिकारी, जि.प.सातारा | सदस्य |
| २०. | कार्यकारी अधिकारी, प्रधानमंत्री ग्रामसडक योजना, सातारा | सदस्य |
| २१. | जिल्हा उद्योग अधिकारी, जिल्हा उद्योग केंद्र सातारा | सदस्य |
| २२. | जिल्हा क्रिडा अधिकारी,सातारा | सदस्य |
| २२. | उपमुख्य कार्यकारी अधिकारी(ग्रामपंचायत),जि.प.सातारा | सदस्य-सचिव |

सदर समिती ग्राम उदय से भारत उदय अभियानाच्या अंमलबजावणीचे केंद्र व राज्य शासनाच्या सूचनांनुसार वेळोवेळी नियोजन करील व अभियानाच्या प्रगतीसंदर्भात संनियंत्रण करील.

जिल्हाधिकारी,
सातारा.

प्रति :- ..............................................................

(समिती सदस्य) यांना माहितीसाठी व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.